लोकमत

# विद्यापीठात क्रीडा प्रशिक्षण कार्यशाळेला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिभागामार्फत तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण आणि एआययू खेळाडू पात्रता नियमावली या विषयावर शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील क्रीडा शारीरिक संचालक यांच्यासाठी घेण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेला प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. येणाऱ्या काळात खेळाडूंना सर्व सुविधानियुक्त तंत्रशुद्ध प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून देण्याची सोय येथे करण्यात येणार आहे असे सांगून त्यांनी विद्यापीठाच्या खेळाडूंना व सर्व शारीरिक शिक्षण संचालकांचे गतवर्षी प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात महेंद्र गोखले यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात अमरावती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी असोसिएशन ऑफ इंडिय युनिव्हर्टिज द्वारा दिलेल्या स्पर्धेसाठी पात्रता यावर मार्गदर्शन केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्तविक केले.

सकाळ

# एकच दणदणाट

## विसर्जन मिरवणुकीत ध्वनी मर्यादेचे सर्रास उल्लंघन

## शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र अधिविभागाकडून ध्वनिमापन


▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : अनंत चतुर्दशीला गुरुवारी सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीत साउंड सिस्टीमच्या (ध्वनी यंत्रणा) घुमलेल्या आवाजाने कान गच्च झाले. शहरातील शांतता क्षेत्र, निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रामध्ये ध्वनी मर्यादेचे उल्लंघन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे झालेल्या ध्वनिमापनातून वास्तव समोर आले.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने गुरुवारी रात्री १० ते

पान ११ वर »

> अनंत चतुर्दशीला विविध २२ ठिकाणी ध्वनिमापन केले. या सर्व ठिकाणी ध्वनी प्रदूषण नियमाच्या मानांकनाची मर्यादा ओलांडली आहे. त्यात अधिकतर साउंड सिस्टीमच्या आवाजाचा समावेश आहे. त्यापाठोपाठ नागरिकांचा गोंगाट, फटाके आणि पारंपरिक वाद्यांचा आवाज आहे.
>
> **- डॉ. आसावरी जाधव,** पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख




### ध्वनिमापन असे...

### निवासी क्षेत्र

- शिवाजी पेठ - ७५.०
- मंगळवार पेठ - ७८.२
- उत्तरेश्वर पेठ - ६८.७
- राजारामपुरी - ५२.०
- नागाळा पार्क - ६१.६
- ताराबाई पार्क - ६३.१

### औद्योगिक क्षेत्र

- वाय. पी. पोवारनगर - ६१.०५
- शिवाजी उद्यमनगर - ५८.४०

### शांतता क्षेत्र

- सीपीआर रुग्णालय - ४२.९
- जिल्हाधिकारी कार्यालय - ८०.१
- न्यायालय - ५३.७
- शिवाजी विद्यापीठ - ४५.२

### आवाजाची मर्यादा

- शांतता क्षेत्र - ४०
- निवासी क्षेत्र - ४५
- व्यावसायिक क्षेत्र - ५५
- औद्योगिक क्षेत्र - ७०

▪ सर्व आकडे डेसिबलमध्ये

सकाळ

# एकच दणदणाट

>> पान १ वरून

सकाळी ६ पर्यंत शहरातील विविध २२ ठिकाणी ध्वनिमापन केले.

त्याचा अहवाल विभागाने आज जाहीर केला. त्यात या सर्व ठिकाणी मोजलेला आवाज ध्वनी प्रदूषण नियमाच्या मानांकनापेक्षा अधिक दिसून आला आहे. विसर्जन मिरवणूक मार्गाव्यतिरिक्त शहरातील इतर ठिकाणी आवाजाची पातळी गेल्या वर्षीपेक्षा कमी राहिली. त्यामध्ये विशेषतः सायंकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत आवाजाच्या पातळीमध्ये वाढ दिसून आली. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, एम. एस्सी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी अमित माने, सुबोध प्रधान, वैष्णवी जाधव यांनी ध्वनी मापनाबाबतचे सर्वेक्षण केले.

30 SEP 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यंदा विसर्जन मिरवणुकीमध्ये ध्वनिपातळीने गाठली कमाल

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचा अहवाल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अनंत चतुर्दशीला यंदा कोल्हापुरात ध्वनिपातळीने कमालीची उंची गाठल्याचा अहवाल शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने दिला आहे. या गणेश विसर्जन मिरवणुकीत दरवर्षी होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाची पातळी यंदा गतवर्षाच्या तुलनेत वाढली आहे.

शांतता, रहिवासी, औद्योगिक आणि व्यापारी अशा चार क्षेत्रांतील ध्वनिप्रदूषणाचे मोजमाप शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी गुरुवारी केले होते. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या ध्वनिपातळी मर्यादेच्या निकषानुसार रात्रीच्या वेळी मिरवणूक मार्गावर केलेल्या या मोजमापासाठी शास्त्रीय मॉनिटरिंग इन्स्ट्रुमेंटचा वापर केला.

अनंत चतुर्दशीला चार क्षेत्रांतील २२ ठिकाणांचे ध्वनिमापन केले, तेव्हा शहरात सर्वच ठिकाणी मोजलेला आवाज हा ध्वनिप्रदूषण कायदा २०००च्या मानांकनानुसार जास्त होता. मुख्य विसर्जन मार्गाव्यतिरिक्त इतर ठिकाणच्या आवाजाची पातळी गतवर्षीपेक्षा कमी आढळली. मात्र, सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंतचा आवाज कमालीचा वाढला आहे. दोन वर्षांत केलेल्या पाहणीत मिरजकर तिकटी ते पापाची तिकटी या मुख्य मार्गावर ध्वनिप्रदूषण वाढले आहे. आवाजाचे निकष रात्रीत शांतता क्षेत्रात ४०, निवासी क्षेत्रात ४५, व्यावसायिक क्षेत्रात ५५ आणि औद्योगिक क्षेत्रात ७० डेसिबल इतके असते.

हा अहवाल शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख पी. डी. राऊत, पर्यावरणशास्त्र विभागाच्या सहायक प्राध्यापक प्रा.डॉ. आसावरी जाधव व प्रा. चेतन भोसले यांच्यासह अमित माने, सुबोध प्रधान व वैष्णवी जाधव या एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी तयार केला आहे.

### हवेचे प्रदूषणही वाढले

- औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५, रात्री ७०
- व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५, रात्री ५५
- निवासी क्षेत्रात दिवसा ५५, रात्री ४५
- शांतता क्षेत्रात दिवसा ५० व रात्री ४० असा निर्देशांक वाढता राहिला.

### आवाजाची मर्यादा (कंसातील आकडे डेसीबलमध्ये गतवर्षीचे)

- शांतता : सीपीआर ४२.९ (७०.१०), जिल्हाधिकारी कार्यालय ८०.०१ (६८.५०), न्यायालय ५३.७ (७२), शिवाजी विद्यापीठ ४५.२ (५०.६०)
- रहिवासी : शिवाजी पेठ ७५ (७०.११), मंगळवार पेठ ७८.२ (७८.३०), उत्तरेश्वर पेठ ६९.७ (७६), राजारामपुरी ५२ (६४.२०), नागाळा पार्क ६१.६ (५४.५०), ताराबाई पार्क ६३ (६६.१०).
- व्यापारी : लक्ष्मीपुरी ५६.२ (७४.१०), बिंदू चौक ६० (७४.९०), मिरजकर तिकटी १०२ (८०.४६), बिनखांबी गणेश मंदिर १०१.०५ (८१.५२), महाद्वार रोड ८८.८ (८२.१५), गुजरी कॉर्नर ८७.९ (७९), पापाची तिकटी ९६.९ (८५.५०), गंगावेश ७७.६ (८२.३०), शाहुपुरी ५७.७ (६७.८०), राजारामपुरी ६४.९ (७७)
- औद्योगिक : वायपी पोवार नगर ६१.०५ (६२.१६), उद्यमनगर ५८.४५ (५८.४०)

पुढारी

# कोल्हापूरकरांच्या कानठळ्या गच्च!

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

**आवाजाची शंभरी पार**

अनंत चतुर्दशीला साऊंड सिस्टीमच्या दणदणाटामुळे कोल्हापूरकरांच्या अक्षरशः कानठळ्या गच्च झाल्या. संध्याकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत आवाजाच्या पातळीने कमाल मर्यादा ओलांडली होती. मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर चौक या ठिकाणी तर आवाजाची मर्यादा तब्बल १०० डेसिबलच्या पुढे गेली होती. शहरातील सर्वच ठिकाणी आवाजाची मर्यादा ध्वनी प्रदूषण नियम २००० च्या मानकापेक्षा अधिक असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या अहवालातून समोर आले आहे.

## या ठिकाणी होता आवाजाचा दणदणाट

| ठिकाण | २०२२ | २०२३ |
|---|---|---|
| शिवाजी पेठ | ७०.११ | ७५.० |
| मंगळवार पेठ | ७८.३० | ७८.२ |
| नागाळा पार्क | ५४.५० | ६१.६ |
| मिरजकर तिकटी | ८०.४६ | १०२.० |
| बिनखांबी मंदिर | ८१.५२ | १०१.५ |
| महाद्वार रोड | ८२.१५ | ८८.८ |
| गुजरी कॉर्नर | ७९.०० | ८७.९ |
| पापाची तिकटी | ८५.५० | ९६.९ |



**22 ठिकाणी ध्वनीमापन**

उत्तरेश्वर पेठ, राजारामपुरी, ताराबाई पार्क, लक्ष्मीपुरी, बिंदू चौक, गंगावेस, शाहूपुरी या भागांमध्ये निश्चित मानकापेक्षा हा आवाज अधिक होता. अनंत चतुर्दशीला शहरातील ४ क्षेत्रांमधील २२ ठिकाणचे ध्वनी मापन करण्यात आले.

गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावर आवाजाची मर्यादा पातळी ओलांडल्याचे निदर्शनास आले. कोल्हापूरकरांनी जसा गणेश मूर्ती दान उपक्रमास प्रतिसाद दिला तसेच ध्वनी प्रदूषणाबाबतही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.
- डॉ. आसावरी जाधव, विभाग प्रमुख पर्यावरणशास्त्र, शिवाजी विद्यापीठ

“ ६० ते ७० डेसिबल इतका आवाज कान सहन करू शकतो. मात्र, १०० डेसिबलपेक्षा अधिक आवाज कानाचे अंतरकर्न खराब करू शकतो. हा आवाज अधिककाळ कानावर पडल्यास कमी ऐकू येते आणि ते लवकर रिकव्हरही होत नाही. दर वर्षी गणेशोत्सवात अशा प्रकारचे सुमारे ५० ते ६० रुग्ण येतात.
डॉ. दिलीप वाडकर, इएनएटी तज्ज्ञ

30 SEP 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साऊंड सिस्टीमचा आवाज विसर्जन मार्गावर वाढला

## शहरात अन्यत्र गतवर्षीच्या तुलनेत आवाजाची पातळी झाली कमी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शहरात अनंत चतुर्दशीला विसर्जन मिरवणूक मार्गावर सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत साऊंड सिस्टीमचा आवाज वाढला होता. ६० ते १०२ डेसिबलपर्यंत साऊंड सिस्टीमचा आवाज मोजण्यात आला. सर्वच ठिकाणी मोजलेला आवाज ध्वनी प्रदूषण नियम-२००० च्या मानांकनापेक्षा जास्त दिसून आला. विसर्जन मिरवणूक मार्ग वगळता अन्य ठिकाणी गतवर्षीच्या तुलनेत आवाजाची पातळी कमी राहिली. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने शहरातील चार क्षेत्रामधील २२ ठिकाणी ध्वनीमापन करुन याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला आहे.

अहवालानुसार शहरातील सर्वच ठिकाणी मंडळांनी लावलेल्या साऊंड सिस्टमच्या आवाजाची मर्यादा ओलांडली असल्याचे निदर्शनास आले. विसर्जन मिरवणूक मार्गावर १०० डेसिबलच्या वर ध्वनीमर्यादा होती. सायलेंट झोनमध्ये असणाऱ्या शाळा, शासकीय-खासगी रूग्णालये, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा सत्र न्यायालय, शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातही ध्वनी मर्यादा ओलांडली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सायलंट झोनमध्ये ४० डेसिबलची मर्यादा असताना जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात ८० डेसिबलपर्यंत ध्वनी पोहचला आहे. रहिवासी झोनमध्येही ४५ डेसिबलची मर्यादा असताना शिवाजी पेठ, मंगळवार पेठ परिसरात ७८ डेसिबल तर व्यावसायिक झोनमध्ये ५५ डेसिबलची मर्यादा ओलांडून बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड, पापाची तिकटी, मिरजकर तिकटी, गुजरी कॉर्नर, गंगावेश या ठिकाणी १०० डेसिबलच्यावर ध्वनीची नोंद झाली आहे. औद्योगिक झोनमध्ये मात्र ध्वनी मर्यादा ओलांडली नसल्याचे आढळले.

**सर्वात जास्त आवाजाची मर्यादा ओलांडलेली ठिकाणे**

| ठिकाण | झोन | ध्वनीचे मापन |
|---|---|---|
| मिरजकर तिकटी | व्यावसायिक | १०२ डेसिबल |
| बिनखांबी गणेश मंदिर | व्यावसायिक | १०१.५ डेसिबल |
| पापाची तिकटी, | व्यावसायिक | ९६.९ डेसिबल |
| महाद्वार रोड | व्यावसायिक | ८८.८ डेसिबल |
| गुजरी कॉर्नर | व्यावसायिक | ८७.९ डेसिबल |
| गंगावेस | व्यावसायिक | ७७.६ डेसिबल |
| बिंदू चौक | व्यावसायिक | ६० डेसिबल |
| जिल्हाधिकारी कार्यालय | सायलेंट | ८०.१ डेसिबल |
| जिल्हा सत्र न्यायालय | सायलेंट | ५३.७ डेसिबल |
| शिवाजी पेठ | रहिवासी | ७५.५ डेसिबल |
| मंगळवार पेठ | रहिवासी | ७८.२ डेसिबल |

- **शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचा अहवाल**

पुण्यनगरी

# दूरशिक्षणच्या 'एमबीए 'साठी आज अखेरची संधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ 'एमबीए डिस्टन्स' या अभ्यासक्रमाकरिता रिक्त जागांसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रवेशित होण्यासाठी शेवटची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी चालू शैक्षणिक वर्षात विद्यापीठामार्फत घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असलेला अथवा महाराष्ट्र शासन, तसेच इतरही मान्यताप्राप्त संस्थांमार्फत घेण्यात आलेल्या मॅनेजमेंटमधील पदव्युत्तर पदवीकरिता प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणारा विद्यार्थी आता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एमबीएकरिता प्रवेश घेण्यास पात्र असणार आहे. याकरिता प्रवेश घेण्याची अंतिम मुदत ही दि. ३० सप्टेंबर आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या आयबीपीएस प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : सन २०२३-२४ या कालावधीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ व बार्टी, पुणे यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार आयबीपीएस प्रवेश परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठ केंद्रामार्फत ९३ विद्यार्थी बसले आहेत. या विद्यार्थ्यांची परीक्षा मानव्यशास्त्र इमारतीमध्ये रविवार, दि. १ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ११ ते १२.३० या कालावधीमध्ये पार पडणार आहे, असे केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी सांगितले आहे.

सकाळ

# 'दूरशिक्षण'ची प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय आणि तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. 'एमबीए डिस्टन्स' या अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांसाठी प्रवेश घेण्याचा उद्या, शनिवार अखेरचा दिवस आहे. बी.ए., बी.कॉम., एम ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र,राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम.,एम.एस्सी (गणित),एम.बी.ए. या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची द्वितीय, तृतीय वर्गाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे भाग एक, दोन, तीन आणि रिपीटर विषयांचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भरायचा आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचा पीआरएन युझर आयडी वापरून त्या लॉगिनमधून परीक्षा अर्ज भरायचा आहे. अर्ज करण्याची मुदत ४ ऑक्टोबरपर्यंत आहे.

सकाळ

# मंडलिक महाविद्यालयात उद्या युवा महोत्सव

**मुरगूड :** येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ४३ वा युवा महोत्सव रविवारी (ता. १ )सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात होत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. कुंभार म्हणाले, '२०१३ नंतर दहा वर्षांनी दुसऱ्यांदा मंडलिक महाविद्यालयाकडे यजमानपद आले आहे. त्यासाठी नेटके नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयातील १५०० विद्यार्थ्यांचा युवा महोत्सवात सहभाग असणार आहे. कॉलेज कॅम्पसमधील वेगवेगळ्या चार मंचांवर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये लोकसंगीत, वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, मूकनाट्य, नकला, भारतीय समूहगीत, सुगम गायन, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा, एकांकिका, पथनाट्य असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. युवा महोत्सवाचे उद्‌घाटन रविवारी सकाळी ९.३० वाजता संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड विरेंद्र मंडलिक यांच्या हस्ते व डॉ. पी.टी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सायंकाळी ५ वाजता लोकनेते सदाशिवराव मंडलिक सांस्कृतिक मंचावर लोकनृत्याचे सादरीकरण होणार आहे.' पत्रकार परिषदेला प्रा. डी.पी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ.टी.एम.पाटील, डॉ. शिवाजी होडगे, प्रा.अव्दैत जोशी, उदय शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
30 SEP 2023
तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# मुरगुडात उद्या विद्यापीठाचा जिल्हा युवा महोत्सव

- मंडलिक महाविद्यालयाकडून नेटके संयोजन

मुरगुड : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये विद्यापीठस्तरीय जिल्हा युवा महोत्सव उद्या. रविवार १ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते रात्रीं स्पर्धा संपेपर्यंत दिवसभर होणार आहेत. शिवाजी विद्यापीठांतर्गत ८० महाविद्यालयाच्या १५०० युवा विद्यार्थी कलाकार या महोत्सवात भाग घेणार आहेत. विजेत्यांना विभागीय स्तरावर कला सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संचलित सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये होणाऱ्या या महोत्सवाची गेले महिनाभर तयारी करण्यात येत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांनी दिली. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दीपक साळुंखे, उपप्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, डॉ. शिवाजी होडगे, डॉ. अद्वैत जोशी, डॉ. उदय शिंदे प्रमुख उपस्थित होते.

२०१२ नंतर तब्बल १० वर्षांनी



अशा महोत्सवाची जबाबदारी मंडलिक महाविद्यालयावर आल्यामुळे येथे उत्साहाचे वातावरण आहे. लोकसंगीत, वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, लघु नाटिका, मूकनाट्य, नकला, भारतीय समूह गान, सुगम गायन ,मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा, एकांकिका अशा विविध १५ कलाप्रकारांमध्ये एकाच वेळी ४ रंगमंचावर स्पर्धा होतील. कलाकारांच्या नाश्ता,

## १० हजारावर युवादर्शक येतील!

पावसाची शक्यता विचारात घेऊन महाविद्यालयाच्या समोर ८०*१०० मीटरचा भव्य पेंडॉल उभारण्यात येत असून ८ ते १० हजार युवक दर्शक म्हणून उपस्थित राहतील, असा संयोजकांचा अंदाज आहे. जिल्हाभर मोक्याच्या ठिकाणी या महोत्सवाचे डिजिटल पोस्टर लावण्यात आली आहेत.

भोजन, चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

महोत्सवामध्ये लोकनेते सदाशिवराव मंडलिक सांस्कृतिक मंचचे उद्घाटन कल्याण-डोंबिवलीचे युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार संजय मंडलिक यांच्या अध्यक्षतेखाली आमदार प्रकाश आबिटकर, 'जय शिवराय'चे कार्याध्यक्ष ॲड. वीरेंद्र मंडलिक, कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. टी. डी. शिर्के, डॉ. पी. के. गायकवाड, डॉ. श्रीमती एस. एस. पाटील, डॉ. ए. एन. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचेही प्राचार्य डॉ. कुंभार यांनी सांगितले.